**नियमित फौजदारी खटला क्र. ४४/२०२३**

**निशाण क्रमांक ५०**

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०७ चा जबाब शपथेवर सुरु.**

**नाव –** प्रशांत संभाजी शिंदे,

**वय–** ५७ वर्षे, **व्यवसाय –** नोकरी (सहा. पोलीस उपनिरीक्षक),

**सध्या नेमणूक –** सुरक्षा शाखा, रत्नागिरी, जिल्हा रत्नागिरी.

**अभियोगपक्षातर्फे सरतपास सरकारी अभियोक्ता श्री. ए. एल. दड्डेकर यांचेकडून –**

**०१.** दिनांक ०८/०४/२०२३ रोजी मी पोलीस ठाणे संगमेश्वर अंतर्गत माखजन पोलीस दुरक्षेत्र येथे कार्यरत होते. दिनांक ०७/०४/२०२३ रोजी कल्पना रमेश पवार, या माखजन पोलीस दुरक्षेत्र येथे आल्या होत्या. त्यांच्या हाताला दुखापत झाली होती. त्यांनी सोनाली मधुकर पवार यांच्याविरुध्द तक्रार दाखल केली होती. सदरची तक्रार मी दाखल करुन घेवुन त्यानुसार घटनेचा प्राथमिक अहवाल १९/२०२३ नोंद करण्यात आला. *(साक्षीदाराला निशाणी क्रमांक १६ कडील तक्रार दाखविण्यात आली). त्यावर माझी सही आहे. त्यावर फिर्यादीचा अंगठा असुन तिच्या पतीने त्यास दस्तुर दिला आहे. त्यातील मजकुर फिर्यादीच्या सांगण्यानुसार नोंदविण्यात आला आहे.*

**०२.** *(साक्षीदाराला घटनेचा प्राथमिक अहवाल क्रमांक १९/२०२३ दाखविण्यात आला). त्यावर माझी सही आहे व फिर्यादीचा त्यावर अंगठा आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. (सदर दस्ताला **निशाणी क्र. ५१** देण्यात येते).*

**०३.** फिर्यादीच्या हाताला दुखापत झाली असल्याने उपचाराकरीता प्राथमिक आरोग्य केंद्र, माखजन येथे उपचाराकरीता पत्र देण्यात आले. *(साक्षीदाराला सदरचे पत्र दाखविण्यात आले). ते तेच असुन त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. (सदर दस्ताला **निशाणी क्र. ५२** देण्यात येते).*

**०४.** फिर्यादीला अधिक उपचाराकरीता ग्रामीण रुग्णालय, संगमेश्वर येथे पाठविण्यात आले. सदर रुग्णालयातील व प्राथमिक आरोग्य केंद्र यांचेकडील फिर्यादीचे वैद्यकीय प्रमाणपत्र हस्तगत करुन ते अभिलेखावर दाखल करण्यात आले. त्यानुसार, गुन्हा नोंदणी क्र. २४/२०२३, भा.द.वि.चे कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात येवुन त्याचा तपास माझ्याकडे लेखी आदेशान्वये देण्यात आला. *(साक्षीदाराला तपासाचा लेखी आदेश दाखविण्यात आला). त्यावर माझी व सहा. पोलीस निरीक्षक श्री. पी. व्ही. देशमुख यांची सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. (सदर दस्ताला **निशाणी क्र. ५३** देण्यात येते).*

**०५.** दिनांक ०९/०४/२०२४ रोजी घटनास्थळी जावुन पंच नामे – अनंत पवार व संदीप पवार यांच्यासमक्ष मी पंचनामा केला. सदरचे घटनास्थळ फिर्यादीचे घर क्र. २७६ च्या समोरील अंगणात होते. सदर घटनास्थळी फिर्यादीचे बांगडयांचे तुकडे पडलेले होते. तसेच कपडे सुकविण्यासाठी बांधलेले बांबु उपटुन टाकुन अंगणात पडलेली दिसत होती. तसेच सदर ठिकाणी जमीन झटापटीमुळे उकरलेली दिसत होती. ज्या ठिकाणी फिर्यादीला आरोपीने मारहान केली होती, ते ठिकाण दाखविण्यात आले व ते पंचनाम्यात नमुद करण्यात आले. तसा पंचनामा १७:०० वाजता सुरु करुन १७:३० च्या दरम्याने पुर्ण करण्यात आला. *(साक्षीदाराला निशाणी क्रमांक २६ कडील पंचनामा दाखविण्यात आला). तो तोच असुन त्यावर माझी, दोन पंचांची सही आहे व फिर्यादीचा अंगठा आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे.*

**०६.** *तेथे घटनास्थळाचा कच्चा नकाशा रेखाटण्यात आला होता. (साक्षीदाराला निशाणी क्रमांक २५ कडील घटनास्थळ नकाशा दाखविण्यात आला). तो तोच असुन त्यावर माझी व दोन पंचांची सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे.*

**०७.** त्यावेळी पो.ना. अनिकेत चव्हाण यांनी घटनास्थळाची छायाचित्रे घेतली होती. ती तपासकामी सामील करण्यात आली आहेत. *(साक्षीदाराला प्रकरणातील*

*दोन छायाचित्रे दाखविण्यात आली). त्यामध्ये मी, फिर्यादी व दोन पंच असे दिसत आहेत.* सदर छायाचित्रांवर माझी व पो.ना. श्री. चव्हाण यांची सही आहे. *(सदर **छायाचित्रांना ओळखीकरीता वस्तु – ब** देण्यात येते).*

**मध्यान्हाची वेळ झाल्याने सरतपास मध्यात्तंराच्या सुट्टीपर्यंत तहकूब.**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,**

ROHINI RAJENDRA KULKARNI

Digitally signed by ROHINI RAJENDRA KULKARNI
Date: 2026.01.17 10:50:18 +0530

(रोहिणी आर. कुलकर्णी)

**दि. १६.०१.२०२६** **न्यायदंडाधिकारी वर्ग–१ देवरुख,**

**स्थळः देवरुख** **जि. रत्नागिरी.**

**मध्यात्तंरानंतर पुढील सरतपास शपथेवर, सहा. सरकारी अभियोक्ता श्री. ए. एल. दड्डेकर यांचेकडून सुरु –**

**०८.** दिनांक ०९/०४/२०२३ रोजी आरोपीने गुन्हयात वापरलेली काठी जमा केली होती. ती मी पंच नामे – अनंत पवार व संदीप पवार यांच्यासमक्ष जप्त केली. सदरची काठी चिव्याची होती व तिची लांबी ४१ इंच व ती ०४ पेरे असलेली होती. तसा पंचनामा मी केला होता. *(साक्षीदाराला निशाणी क्रमांक २४ कडील घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला). तो तोच असुन त्यावर माझी, आरोपीची व दोन पंचांची सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे.* सदरचा पंचनामा १८:०० वाजता सुरु करुन १८:२० च्या दरम्यान पुर्ण करण्यात आला.

**०९.** सदर पंचनाम्यावेळी पो.ना. श्री. अनिकेत चव्हाण यांनी छायाचित्रे घेतली होती. *(साक्षीदाराला दिनांक ०९/०४/२०२३ रोजीची छायाचित्रे दाखविली). अनुक्रमांक ०१ कडील छायाचित्रांत आरोपी, दोन पंच व मी दिसत असुन ते आरोपीचे घरी घेण्यात आलेले छायाचित्र आहे. अनुक्रमांक ०२ कडील छायाचित्रे हे घटनास्थळ पंचनामा करतेवेळीचे आहे. सदर छायाचित्रांच्या एकत्रीत*

*प्रतीवर माझी सही आहे. (सदर **<u>छायाचित्रांना एकत्रीतपणे ओळखीकरीता वस्तु – क</u>** देण्यात येते).*

**१०.** त्यानंतर, आरोपीला फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४१–अ–१ अन्वये नोटीस देण्यात आली होती. *(साक्षीदाराला नोटीस दाखविण्यात आली). तीच असुन त्यावर माझी व आरोपीची सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. (सदर दस्ताला **<u>निशाणी क्र. ५४</u>** देण्यात येते).* तसेच आरोपीच्या आधारकार्डाची प्रत हस्तगत करुन ती मी अभिलेखात सामील केली.

**११.** जप्त मुद्देमालाची मुद्देमाल पावती तयार करण्यात आली होती. *(साक्षीदाराला मुद्देमाल पावती दाखविण्यात आली). त्यावर माझी व मुद्देमाल स्वीकारणार श्रीमती व्ही. एस. तांबडे यांची सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. (सदर दस्ताला **<u>निशाणी क्र. ५५</u>** देण्यात येते).*

**१२.** घटनास्थळी प्रत्यक्षदर्शी साक्षीदार फिर्यादीचे पती – रमेश पवार यांचे तपासटिपण नोंदवुन ते मी तपासकामी सामील केले. पो.ना.श्री. अनिकेत चव्हाण यांचे मी तपासटिपण नोंदविले. तसेच त्यांच्याकडुन भा.पु.का.कलम ६५–ब अन्वयचे प्रमाणपत्र हस्तगत केले.

**१३.** फिर्यादीचे ग्रामीण रुग्णालय, संगमेश्वर व प्राथमिक आरोग्य केंद्र, माखजन यांचेकडील वैद्यकीय प्रमाणपत्र मिळणेसाठी त्यांना मी पत्र व्यवहार केला होता. *(साक्षीदाराला निशाणी क्रमांक ४४ व ३८ कडील पत्र दाखविण्यात आले). ते तेच असुन त्या दोन्हींवर माझी व संबंधीत रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी यांची पोहोच म्हणुन सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे.* त्यानुसार, प्राप्त झालेले फिर्यादीचे वैद्यकीय प्रमाणपत्र अभिलेखात मी सामील केले.

**१४.** एकंदरीत तपासावरुन, आरोपीने गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्याने आरोपीविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले. आरोपीला दाखविल्यास मी ओळखू शकतो. आज रोजी आरोपी न्यायालयात हजर आहे.

**सरतपास पुर्ण.**

**<u>उलटतपास – निशाणी क्रमांक ५६ कडील आदेशान्वये सदर साक्षीदाराचा उलटतपास तहकुब.</u>**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

ROHINI RAJENDRA KULKARNI

Digitally signed by ROHINI RAJENDRA KULKARNI
Date: 2026.01.17 10:50:25 +0530

**(रोहिणी आर. कुलकर्णी)**

दि. १६.०१.२०२६ न्यायदंडाधिकारी वर्ग–१ देवरुख,

स्थळः देवरुख जि. रत्नागिरी.

-:CERTIFICATE:-

I affirm that the contents of this Pdf file evidence are same words as per original Judgment/order/evidence.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | S. A. Bhale |
| Court Name | :- | The Court of Civil Judge (J.D.) & Judicial Magistrate F.C., Deorukh |
| Date of decision | :- | 16/01/2026 |
| evidence signed by PO. on | :- | 16/01/2026 |
| evidence uploaded on | :- | 17/01/2026 |